जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १९.०९.२०२५**

‘‘चरस या अंमली पदार्थासह मुद्देमाल जप्त ’’

दिनांक १४/०९/२०२५ रोजी पोहवा/ अमोल देसाई यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सापळा कारवाई केली असता शिळफाटाकडुन मुंब्रा बाजुकडे जाणा-या वाहिनीवरील, हावरे सिटी नवीन बांधकामाच्या समोरील सार्वजनिक रोड, शिळफाटा, ता.जि.ठाणे येथे इसम नामे **मसुद बद्रुद्दीन ऐनरकर वय २९ वर्षे, धंदा चालक, रा. अपनानगर, खोंडा दापोली, ता.दापोली, जि.रत्नागिरी** याने आपले ताब्यात १ किलो १०६ ग्रॅम वजनाचा ‘‘चरस’’ हा अंमली पदार्थ व इतर वस्तु असा एकुण **१,१०,८०,४२०/- रू चा मुद्देमाल विक्रीकरीता** जवळ बाळगला असताना मिळुन आला आहे.

सदर प्रकाराबाबत मसुद बद्रुद्दीन ऐनरकर वय २९ याचे विरूध्द शिळ डायघर पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ८६७/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २० (ब) (पप)(क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात येवुन त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली अुसन त्याची दिनांक २३ /०९/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे. नमूद गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि/ सोमनाथ कर्णवर - पाटील, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे हे करीत आहे.

यातील अटक आरोपीत याने सदरचा चरस हा अंमली पदार्थ कोणाकडुन आणला ? याबाबत तपास चालु आहे. तसेच चरस हा अंमली पदार्थ विदेशातुन भारत देशात तस्करी करून आणण्यात आला असण्याची शक्यता आहे. सदर गुन्हयात आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्करीचे रॅकेट कार्यरत असण्याची दाट शक्यता असुन त्या अनुषंगाने पुढील तपास करण्यात येत आहे.

सदर कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.रविंद्र दौंडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे श्री.राहुल मस्के, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सपोनि/ निलेश मोरे, सपोनि/सोमनाथ कर्णवर - पाटील, पोउपनि/राजेंद्र निकम, पोउपनि/दिपक डुम्मलवाड, पोहवा/ शिवाजी रावते, पोहवा/हरीष तावडे, पोहवा/संदीप चव्हाण, पोहवा/अभिजीत मोरे, पोहवा/ अमोल पवार, पोहवा/अमोल देसाई, पोहवा/हुसेन तडवी, पोहवा/अजय सपकाळ, पोहवा/अमित सपकाळ, पोहवा/नंदकिशोर सोनगिरे, पोहवा/गिरीष पाटील, पोशि/आबाजी चव्हाण, चापोना/ अनुप राक्षे, मपोहवा/ शिल्पा कसबे, मपोशि/ कोमल लादे यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर